# महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ
## भविष्य निर्वाह निधी विश्वस्त मंडळ

फोन नं. ०२२-२४०१०३६४
०२२-२४०३१४९८
फॅक्स नं.०२२-२४०९३११०
Email- cpfmseb.2011@gmail.com
website :www.mahadiscom.in

एस्टेला बॅटरीज विस्तारीत इमारत
भविष्य निर्वाह निधी विभाग
धारावी रोड, माटुंगा (पु) मुंबई ४०० ०१९.


क्र.लेवि/भनिनि/उचलगट/ D|37 दिनांकः- 10 JAN 2020

### परिपत्रक - २१७

**विषयः**- मंडल / विभाग अंतर्गत कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यांच्या मागील भनिनि अग्रीम अदत्त रक्कम वसुलीबाबत.(Outstanding liability Balances Of Previous Loan)

१) वरील विषयानुसार भनिनि कार्यालयाच्या वैयक्तिक लेखा खाते तपासणीनुसार आपल्या मंडल / विभागांतर्गत कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यांना पुर्वी मंजुर झालेल्या भनिनि अग्रीम रक्कमेपैकी काही रक्कम अदत्त असल्याचे आढळुन आले आहे. **(Outstanding Bal. liability means Outstanding Principal Amount, Outstanding Interest Amount and outstanding BOT 1%).**

२) त्यामुळे सदर कर्मचाऱ्यांना दुसरी आगाऊ रक्कम मंजूर करताना अंशदायी भनिनि विनियम (१९६०)नियम **क्रं. १७"ग"** नुसार "मागील आगाऊ रक्कम, त्यावरील व्याज व १% BOT याची अंतिमरित्या परतफेड झाल्यानंतर किमान तीन महिन्यांचा कालावधी लोटल्याशिवाय दुसरी आगाऊ रक्कम मंजुर करण्यात येत नाही " अथवा ज्या कर्मचाऱ्यांची फक्त एका आगाऊ रकमेची अदत्त रक्कम बाकी आहे, (Outstanding Bal liability) अशा कर्मच्याऱ्यांना दुसरी आगाऊ रक्कम ही केवळ स्वतःच्या वैद्यकीय खर्चासाठी देता येते (Medical Treatment for self ).

३) तरी मानव संसाधन विभागाने सोबत जोडलेल्या अदत्त रकमेच्या यादीनुसार ( Outstanding Bal liability List.) योग्य ती पडताळणी करूनच (Audit), सदर कर्मचाऱ्यांकडुन अदत्त रक्कमेची वसुली रोखीने अथवा कर्मचाऱ्यांच्या मासीक वेतनातुन करावी. व त्याची नोंद भनिनि अनुसुची (CPF Schedule/ S&R) मध्ये दर्शविण्यात यावी.

४) भनिनि विभागीय परिपत्रक क्रं. ९० दि. ११.१२.१९९१ नुसार अग्रिमाची मुदतपुर्व परतफेड करण्याबाबत,(Lumpsum Repayment) संबंधित अधिकाऱ्यांनी असे अर्ज मंजुर करताना अर्जदाराकडुन एकुण अग्रीमापैकी ५०% अग्रीम वसुली झाली आहे याची खात्री करुन नंतरच अर्ज मंजुरीसाठी ग्राहय धरावेत.

तसेच एकरकमी वसुल करावयाची राशी व अग्रीमवर नियमानुसार देय होणारे व्याज व १% BOT स्थानिक अंकेक्षण विभागाकडुन तपासुन घेऊन मगच संपुर्ण तपशीलासह तशा आदेश काढण्यात यावा.

आगाऊ रकमेची मुदतपुर्व एकरकमी परतफेड करतानाचा अर्ज हा सदर कंपनीच्या भनिनि पोर्टलवर कर्मचाऱ्याच्या सेल्फ रिपोर्ट सिसटीम व्दारेच भरावा.(Mozilla App मध्ये MSEB CPF Portal of Employees self report system throught online )

५) कर्मचाऱ्यांची मुदतपुर्व एकरक्कमी आगाऊ रक्कम/ अदत्त रक्कम (Lumpsum Repayment/ or Outstanding Bal liability) भरली असल्यास अथवा वसुल केली असल्यास, ति ज्या महिन्यात व वर्षात वसुल केली गेली असेल तोच महिना व वर्ष हे पुर्णत्वाची तारीख म्हणुन ग्राहय धरली जाईल (Loan Completed date) व त्यानंतर तो महिना पुर्ण झाल्यानंतर पुढे ३ महिने मोजण्यात येतील.

६) ज्या कर्मचाऱ्यांनी आगाऊ रक्कमेसाठी अर्ज केलेला आहे, त्या कर्मचाऱ्यांना त्या संदर्भातील संदेश (Message) म्हणजेच अर्जाचा आवक क्रं. ( Inward No.) व मंजुरी क्रं. (Sanction No.) हा त्यांनी रजिस्टर केलेल्या भ्रमणध्वनीवर अथवा ई-मेल वर पाठवण्यात येईल, (Through System) व अर्ज मंजुर झाल्या नंतरच दहा **(कामकाजाच्या)** दिवसात त्या कर्मचाऱ्यास आगाऊ रक्कमेचे प्रदान केले जाईल.

७) जे कर्मचारी निवृत्त झाले आहेत पण त्यांचे अंतिम प्रदान प्रस्ताव अदयापही मंजुर झालेले नाहीत अशा सर्व निवृत्त कर्मचाऱ्याकडुनही संबधीत रक्कम वसुल (१ % BOT) केलेल्याचा अहवाल भ.नि.नि कार्यालयास सादर करावा, जेणेकरुन सदर कर्मचाऱ्यांचे अंतिम प्रदान प्रस्ताव लवकर पुर्ण होतील.

८) अदत्त रकमेची पुर्ण माहिती ही सदर कर्मचाऱ्यास संगणकाव्दारे कंपनीच्या पोर्टलवर (PLA Slip) वैयक्तीक लेखा खाते सदरातही पाहता येईल.

९) तरी वरील सुचनेनुसार कृपया सर्व कर्मचाऱ्यांची अदत्त रक्कम योग्य पडताळणी (Audit) करून (Outstanding Bal liability) मार्च २०२० पर्यंत सदर कार्यालयाने त्या त्या कर्मचाऱ्यांनाकडुन वसुल करुन घ्यावी. त्यानंतर अग्रीम मंजुर करताना जर अडचणी निर्माण झाल्या अथवा कर्मचाऱ्याचे अग्रीम मंजुर करता आले नाहीत तर त्यास भनिनि कार्यालय जबाबदार राहणार नाही हया गोष्टीची दखल घेण्यात यावी.

हे पत्रक महानिर्मिती / महापारेषण/ महावितरण कंपनीच्या संकेत स्थळावर उपलब्ध आहे.

सचिव

विश्वस्त मंडळ (भनिनि)

महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ

सोबत:-

१) अदत्त रकमेची यादी
(Outstanding Balance liability List as per system generated )

२) भनिनि विभागीय परिपत्रक क्रं. ९० दि. ११/१२/१९९१.
(Lumpsum Repayment Instrction copy )

३) मुदतपुर्व एकरक्कमी आगाऊ रक्कम परतफेडीचे सुत्र
(Lumpsum Repayment Calculation formula)